केली जाते. युरोपियन देशांनी कीटकनाशके उपविभागीय अधिकारी रवी हरणे यांनी केले.

# आवळा प्रक्रिया प्रशिक्षणाला महिलांचा प्रतिसाद

अॅग्रोवन वृत्तसेवा

नांदेड : पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने महिला आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकणासाठी आयोजित आवळा प्रक्रिया प्रशिक्षणाला महिलांचा प्रतिसाद मिळाला.

कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीच्या वतीने तीन दिवसीय आवळा प्रक्रिया प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी ग्रामीण, शहरी महिलांचा प्रतिसाद मिळाला. या प्रशिक्षणाचे उद्‍घाटन संस्थेच्या अध्यक्षा शोभा जाधव, सचिव शर्मिष्ठा जाधव यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी त्यांनी महिलांना मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सक्षम होण्याकरिता शेतीबरोबरच पूरक व्यवसाय करण्याचे आवाहन केले. कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख, प्रा. माणिक कल्याणकर, डॉ. एम. एन. अंबोरे, प्रा. एस. एच. जायभाये यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचे आयोजन गृहविज्ञान तज्ज्ञ प्रा. एस. पवळे पाटील यांनी केले. एस. ए. कावळे यांनी महिलांना प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रा. पवळे पाटील यांनी खाद्यपदार्थांचे पॅकिजिंग, लेबलिंग, लायसनिंग आणि मार्केटिंगचे सादरीकरणातून मार्गदर्शन केले.

आवळा 'क' जीवनसत्वयुक्त असला तरी तुरट चवीमुळे खाणे बऱ्याचदा शक्य होत नाही. त्यामुळे प्रक्रिया करून त्यापासून कँडी, मुरावळा, लोणचे, पावडर, चटणी आणि सुपारी यासारखे प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करून खाणे सहज शक्य होते. तसेच हे पदार्थ विक्रीचा उद्योगदेखील उभारून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतील, या दृष्टिकोनातून प्रशिक्षण आयोजित केले होते.



नांदेड : कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीच्या वतीने तीनदिवसीय आवळा प्रक्रिया प्रशिक्षणात उपस्थित महिलांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.